२०७१५४४१. सुधारित



# सन १८२७ चा मुंबई विनियम २९.

## दख्खन आणि खानदेश मधील मुंबईचे प्रदेश विनियमांच्या अंमलांखालीं आणण्याबाबत विनियम.

[१ ऑगस्ट १८२७.]

हा विनियम, पुढील विनियम व अधिनियम याअन्वयें अंशतः रद्द करण्यांत आला :—

सन १८२४ चा मुंबई विनियम ४.
सन १८४२ चा अधिनियम ६.
सन १८४६ चा अधिनियम ११.
सन १८६८ चा अधिनियम ४.
सन १८६९ चा अधिनियम १४.
सन १८७६ चा अधिनियम १०.
सन १८७६ चा अधिनियम १२.
सन १८९४ चा अधिनियम ४.

ह्या विनियमांत सन १८३१ चा मुंबई विनियम १६, कलम २ याअन्वयें सुधारलेला सन १८३१ चा मुंबई विनियम १ अन्वयें भर घालण्यांत आली.

सन १८३५ चा अधिनियम १९ याअन्वयें त्यांत भर घालण्यांत आली.

त्यांत पुढील आदेशांअन्वयें अनुकूलन व रूपभेद करण्यांत आलें :—

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.
विधि अनुकूलन आदेश, १९५०.

ज्याअर्थी, कंपनी सरकारनें, दख्खन व खानदेशांतील दिवंगत पेशव्यांचा प्रदेश जिंकून घेतल्यानंतर आणि इतर संस्थानांशीं उक्त प्रदेशांतील इतर प्रदेश तह व कबुलायत करून संपादन केल्यानंतर, उक्त सर्व प्रदेशांचें शासनकार्य व्यापक प्रमाणांतील बदल एकाएकी सुरू करण्याचें टाळण्याच्या दृष्टीनें गव्हर्नर-इन्-कौन्सिलच्या आदेशांनुसार एका विशिष्ट पद्धतीनें चालविण्यांत येत होतें आणि अशा पद्धतीचा हेतु प्रशासनाचें सामान्य नियम अंमलांत आणण्याचा मार्ग तयार करणें हा होता; प्रस्तावना.

आणि ज्याअर्थी, मुंबई प्रदेशाच्या प्रशासनासंबंधींचे विनियम मध्यंतरी सुधारण्यांत आले आणि सुधारलेल्या विनियमांच्या म्हणजे सन १८२७ च्या पहिल्या २६ विनियमांच्या अंमलाखालीं दख्खन आणि खानदेशचे प्रदेश आणणें आतां इष्ट झालें आहे;

त्याअर्थी, पुढीलप्रमाणें नियम करण्यांत आले आहेत :—

१. * * *

२-एक. सन १८२७ चे पहिले सव्वीस विनियम हे, विरुद्ध मजकुराचा विशिष्ट विधि करण्यांत आला नसेल तर, तारीख १ माहे सप्टेंबर सन १८२७ पासून ह्या विनियमाचे परिशिष्ट अ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें पुणें आणि अहमदनगर जिल्ह्यांचा मिळून झालेल्या मुंबई प्रदेशांतील दक्षिण व खानदेश या सबंध मुंबई प्रदेशांत अंमलांत येतील आणि परिणामक्षम असतील.

दोन. [फी] सन १८७६ चा अधिनियम १२ याअन्वयें रद्द करण्यांत आलें.

---

*दिनांक १ नोव्हेंबर सन १९५९ पर्यंत सुधारलेला.

न्यायालयाच्या अधिकार-क्षेत्रांतून वगळलेलें इसम.

३-एक. उक्त जिल्ह्यांच्या संदर्भात, यांत पुढें दिलेल्या विवक्षित दर्जाच्या इसमांविरुद्धचे दावे दिवाणी न्यायालयांच्या अधिकारक्षेत्रांत येणार नाहींत.

यादी न्यायाधीशास सादर करणें.

दोन. अशा दर्जाच्या उक्त इसमांची यादी [राज्य सरकारनें] न्यायाधीशास पुरविली पाहिजे; आणि वादी किंवा प्रतिवादी या नात्यानें एखाद्या इसमानें अर्ज करून आपल्या हितासाठीं अशी यादी आपणास मिळणें आवश्यक आहे असें दाखवून दिल्यास, न्यायाधिशानें ती त्याला कळविली पाहिजे.

अशा इसमांविरुद्ध केलेल्या दाव्यांचा इन्साफ करण्याकरितां अभिकर्त्यांची नेमणूक.

४-एक. दिवाणी स्वरूपाच्या ज्या तक्रारींची सामान्य नियमान्वयें पुणें आणि अहमदनगर येथील न्यायाधिशांपैकीं कोणत्याहि न्यायाधिशास दखल घेतां येत असेल व ज्या निकटपूर्वीच्या कलमांतील कोणत्याहि इसमांविरुद्ध दाखल करण्यांत आल्या असतील, त्या सर्व तक्रारींचा इन्साफ करण्याकरितां आणि त्यांचा निर्णय करण्याकरितां (राज्य सरकारचा) एक अभिकर्ता खास नेमण्यांत आला पाहिजे: अशा अभिकर्त्यास अशा दर्जाच्या उक्त इसमांची यादी आणि अशा प्रत्येक इसमाबाबत अनुसरावयाच्या कार्यरीतीसंबंधींच्या त्या त्या नियमाचें वर्णन ज्यांत असेल अशा सूचना देण्यांत आल्या पाहिजेत.

अशा अभिकर्त्यांना यादी आणि सूचना देणें.

तसेंच अशा अभिकर्त्यानें, अशा कोणत्याहि इसमानें अर्जाद्वारें, त्यास उपरिनिर्दिष्ट माहिती त्याच्या हिताच्या दृष्टीनें मिळणे किती महत्त्वाचे आहे हें दर्शविल्यावर, त्यांस अशी माहिती कळविली पाहिजे.

यादी व सूचना यांत कोणत्या गोष्टीं व कोणत्या तरतुदीं असाव्यात.

दोन. उपरिनिर्दिष्ट यादीचे अशा इसमांच्या दर्जानुसार तीन वर्ग असतील; आणि उपरिनिर्दिष्ट सूचनांत, उक्त इसमांच्या दर्जानुसार ठरविलेल्या प्रत्येक वर्गास लागू होतील अशा तीन प्रकारच्या कार्यरीतींची तरतूद असली पाहिजे.

पहिल्या वर्गांतील इसमांविरुद्ध दावे कसे चालवावेत.

५-एक. उच्च घराण्यांतील जन्म, राजकीय महत्त्व किंवा धार्मिक मोठेपणा यामुळें जे इसम पेशवे सरकारांत मानाच्या हुद्यावर होते आणि केवळ ह्याच कारणामुळें ज्या इसमांचा अभिकर्त्याच्या यादींतील पहिल्या वर्गांत निर्देश केला आहे अशा इसमांविरुद्ध केलेले दावे स्वतः अभिकर्त्यानें चालवून त्यांचा निर्णय दिला पाहिजे; व तसें करतांना त्यानें प्रतिवादीस पूर्वीच्या चालीरीतीमुळें किंवा वहिवाटीमुळें मिळालेल्या सर्व विशेषाधिकारांकडे आणि तशाच चालीरीतीमुळें किंवा वहिवाटीमुळें त्या प्रकरणांत उद्भवणाऱ्या इतर वैशिष्टपूर्ण गोष्टींकडे जास्तींत जास्त प्रमाणांत लक्ष पुरविण्यांत आलें पाहिजे. केलेलें दावे अभिकर्त्यानें चालविलें पाहिजेत आणि त्यांचा इन्साफ केला पाहिजे. अशा दाव्यांत पूर्वीची चालीरीति व वहिवाट तसेंच प्रतिवादीचा दर्जा, पेशवे सरकारांतील त्याचा दर्जा, त्यांचीं सध्याचीं कर्जफेडीचीं साधनें, आणि वादीच्या मागणीच्या न्याय्यतेसंबंधीं महत्त्वाचे असे मुद्दे आणि प्रतिवादीची जबाबदारी ह्यांचा विचार प्रामुख्याने केलेला असला पाहिजे.

राज्य सरकारकडे अपील करणें.

अभिकर्त्याच्या निर्णयाविरुद्ध वर सांगितल्याप्रमाणें रचना केलेल्या राज्य सरकारच्या वरिष्ठ न्यायालयाकडे कोणत्याहि पक्षकारास अपील करतां येईल:

अपिलाचा विनंति-अर्ज, अभिकर्त्यानें निर्णय दिल्यावर नव्वद दिवसांच्या आंत, आणि अशा कोणत्याहि प्रतिवादी विरुद्ध दिलेल्या हुकूमनाम्याची बजावणी, असा दावा आणि त्यासंबंधींचें सर्व कामकाज आदेशासाठीं राज्य सरकारकडे पाठविण्यांत येईपर्यंत करतां कामा नये. अशा हुकुमनाम्यावर वादीस अपील करतां येईल. राज्य सरकार अशा हुकूमनाम्याच्या बाबतींत, अशा दाव्यांच्या तडजोडीकरितां नेमलेलें खास वरिष्ठ न्यायालय या नात्यानें, त्यास योग्य व न्याय्य वाटतील असे आदेश देईल व अशा आदेशावर कोणत्याहि पक्षकारास सर्वोच्च न्यालयाकडे अपील करतां येईल. मुदत. हुकूमनामे राज्य सरकारकडे आदेशासाठीं पाठविल्या-खेरीज त्यांची बजावणी न करणें.

दोन. वर उल्लेख केलेल्या इसमांच्या योग्यतेइतके नसले तरी जे पेशवे सरकारांत महत्त्वाच्या आणि वरिष्ठ हुद्यांवर होते आणि म्हणून अभिकर्त्याच्या यादींत ज्यांचा निर्देश दुसऱ्या वर्गांत केला आहे अशा इसमांविरुद्ध अभिकर्त्याकडें किंवा राज्य सरकारकडें सादर केला पाहिजे (अशी मुदत वाजवी कारण असल्यास वाढवितां येईल.) दाव्याच्या मूळ इन्साफासाठीं जे नियम विहित केले आहेत तेच नियम अपील चालविणें व त्याचा निर्णय करणें या गोष्टींस लागू असतील. तसेंच सर्वोच्च न्यायालयाकडे कोणत्याहि पक्षास अंतिम अपील करण्याचा हक्क आहे. अपील. दुसऱ्या वर्गाच्या इसमांविरुद्ध दावे कसें चालवावेत

तीन. पूर्वी सांगितलेल्या वर्गापेक्षां कमी दर्जाच्या परंतु आतांपर्यंत त्यांनीं उपभोगिलेल्या विशेष अधिकारामुळें ज्यांना योग्य हक्क आहे आणि ज्यांचा अभिकर्त्याच्या यादींत तिसऱ्या वर्गांत निर्देश केला आहे अशा इसमांविरुद्ध केलेले दावे अभिकर्त्यानें चालविलें पाहिजेत आणि त्याचा इन्साफ केला पाहिजे; तसें करतांना त्यास दोन वरिष्ठ वर्गाच्या विरुद्ध केलेल्या दाव्यांसंबंधींचा निर्णय नियमित करण्यासाठीं जे मुद्दे वर सांगितलेलें आहेत अशा मुद्यांचा कांहीं अंशीं विचार करतां येईल आणि सामान्य विनियमांबाबत कांहीं अंशीं सूट देतां येईल आणि तसेच त्यास चालीरीती व वहिवाट यांचा विचार करतां येईल. तिसऱ्या वर्गांच्या इसमांविरुद्ध केलेले दावे कसे चालवावेत.

अभिकर्त्याच्या निर्णयाविरुद्ध कोणत्याहि पक्षास सदर दिवाणी अदालतीकडे अपील करतां येईल. सदर अदालतीकडें अपील करणें.

अपीलाचा विनंति-अर्ज अभिकर्त्याकडें किंवा सदर दिवाणी अदालतीकडें, अभिकर्त्यानें निर्णय दिल्यावर नव्वद दिवसांच्या आंत सादर केला पाहिजे (ही मुदत वाजवी कारण असल्यास वाढवितां येईल) : आणि मूळ दावा चालवून त्याचा इन्साफ करण्याकरितां जे नियम केले आहेत तेच नियम अशा अपीलाचा इन्साफ करून त्याचा निर्णय करण्याच्या बाबतींत लागू असतील; आणि अशा दाव्यासंबंधींचें अभिकर्त्याचें मत राज्यसरकारनें सदर दिवाणी अदालतीस कळविलें पाहिजे. कोणत्याहि पक्षास सर्वोच्च न्यायालयाकडे अंतिम अपील करतां येईल. मुदत.

६. [न्यायलयाच्या अधिकारक्षेत्रांतून विवक्षित प्रकारचे दावे वगळणें] सन १८७६ चा अधिनियम १० अन्वयें हें कलम गाळण्यांत आलें.

७. [वकील ; अधिकार क्षेत्र ; अपिलें हुकुमनाम्यांची अंमलबजावणी.] हें कलम, सन १८६९ चा अधिनियम १४ या अन्वयें गाळण्यांत आलें.

## परिशिष्ट अ.

[कलम २, कंडिका (१) पहा.]

पेशव्यांकडून जिंकून घेतलेला प्रदेश (तारीख ११ फेब्रुआरी सन १८१८ ची प्रदेश ताब्यात घेण्यासंबंधींची घोषणा पहा), तसेंच होळकरांनीं स्वाधीन केलेला प्रदेश (तारीख ६ माहे जानेवारी सन १८१८ चा तहनामा पहा), शिंद्यांनीं स्वाधीन केलेला प्रदेश (तारीख ६ माहे फेब्रुआरी सन १८२० चा तहनामा पहा), आणि निजामानें स्वाधीन केलेला प्रदेश (तारीख १२ माहे डिसेंबर सन १८२२ चा तहनामा पहा). यांनीं लेनबल्य, मुंबई इलाख्यांत समाविष्ट केलेल्या दक्षिण आणि खानदेश या मधील जिल्ह्यांचें प्रादेशिक वर्णन.

## पुणें जिल्हा

हवेली-पुणें आणि कर्यात-मावळ हे दोन तरफ.

केरूबारा या तरफांतील पुढील पंधरा गांवें :—

१. शिवरें.
२. कोंढणपूर.
३. कल्याण.
४. राहतवडें.
५. उंब्रा.
६. अरवी.
७. दिवरें.
८. कामसा.
९. खेतकावळें.
१०. कुंबोशी.
११. गावरदरी.
१२. गोगलवांड.
१३. कुमथडी.
१४. खेड शिवापूर.
१५. केळवड.

मुसाखोरा या तरफांतील पुढील तीन गांवें :—

१. जांभळी.
२. सोनापूर.
३. संगरुण.

मुठाखोर या तरफांतील पुढील तीन गांवें :—

१. आंबेगांव.
२. भावली.
३. आंबी.

कानडखोरा या तरफांतील पुढील दोन गांवें :—

१. विंजेर.
२. अंत्रोळी.

हरसूद-मावळ या तरफांतील आपटी हें गांव.

सांदूस, पाटस, पानबळ, माहळुंग, औशिरी, खेड, चाकण, घोडा, वाडा, आंबेगांव, जुन्ना, व्होतूर, अला, बेला, मारखोडा, कोकटनेर, मिनेर आणि नारायणगांव हे अठरा (१८) तरफ.

कुरडा या तरफांतील पुढील दहा गांवें :—

१. आंबी.
२ खांबोरी.
३ बारडी.
४ लवकी.
५ नांदुर कांडुमळ.
६ भोगरी.
७ अलडारा.
८ लिंगडी.
९ घासगांव.
१० पिंपळगांव जोग.

आंदरमावळ, नानी मावळ आणि पौड खोरा हे तीन तरफ.

पौन मावळ या तरफांतील पुढील बत्तीस गांवें :—

१ कारुंज.
२ आंबेगांव.
३ पुसणी.
४ चांदखेड.
५ किला.
६ शेवती.
७ सिंदगांव.
८ पावळा.
९ कुरडा.
१० शिरवली.

पौन मावळ या तरफांतील पुढील बत्तीस गांवें :—चालू.

| | |
|---|---|
| ११ घिवंडी अलवण. | २२ कुसगांव. |
| १२ आपटी. | २३ येळशी. |
| १३ कौतेर खडक. | २४ बेबरवोहोळ. |
| १४ मळवली. | २५ रीहा. |
| १५ शिवळी. | २६ पावचणा. |
| १६ आरीदिव. | २७ बेरशी. |
| १७ शिवनेर. | २८ बादवली. |
| १८ बाऊवेर. | २९ अरा. |
| १९ ठुगांव. | ३० उरशी. |
| २० पारदवडी. | ३१ गोटवरें. |
| २१ महागांव. | ३२ अडाळा खुर्द. |

काडी पाठार, सासवड आणि सुपा हे तीन तरफ.

नीरथडी आणि शिरवळ ह्या दोन तरफांचा नीरा नदीच्या उत्तरेकडील असेल तितका भाग.

इंदापूर, बारामती, मोहोळ, सीना नदीच्या पश्चिमेकडील टापूंतील प्रदेश, भुसा आणि टेंभुर्णी हे सहा तरफ.

कारकम या तरफमधील पुढील चार गांवें :—

| | |
|---|---|
| १ गुरसळी. | ३ करोळा. |
| २ बादलकोट. | ४ उजीनी. |

काठी ह्या तरफमधील पुढील दोन गांवें :—

| | |
|---|---|
| १ सोरटीं. | २ शंकरगाव. |

सोलापूर, अहिरवाडी व मान्द्रुप हे तीन तरफ.

सम्मट फुटगांव या नांवाचीं पुढील पांच गांवें :—

| | |
|---|---|
| १ आंदळ. | ३ नेरखेड. |
| २ सुरांची. | ४ दारफळ. |

५ मंग्रुळ.

इंडी, तांबा, हिप्परगी, जुळवड-कोकटनूर, अलमेल, बार्दुल आणि उकळी हे सहा तरफ.

हवेली विजापूर या तरफमधील पुढील तीन गांवें :—

| | |
|---|---|
| १ उक्मन्हाळ. | २ कौलगा. |

३ अहिलीआबाद.

होर्टी या तरफमधील पुढील चार गांवें :—

| | |
|---|---|
| १ रांजनहाळ. | ३ तिलीहाळ. |
| २ मिंचनहाळ. | ४ क्यातिलकीर. |

होनवड या तरफमधील पुढील सहा गांवें :—

| | |
|---|---|
| १ जळीहाल. | ४ अरहळ्ळी. |
| २ रामतिरत. | ५ कळतावतेगी. |
| ३ येतीनहाल. | ६ घोणसगी. |

आंती या तरफमधील पुढील सात गांवें :—

| | |
|---|---|
| १ अराळहट्टी. | ४ मंगसुळ. |
| २ अबिहाळ. | ५ बेलघरी. |
| ३ तंगररी. | ६ संवर्गी. |

७ बेमणहाळ.

हळसंघी या तरफमधील पुढील दोन गांवें :—

| | |
|---|---|
| १ भाटगुंक. | २ गोटीहाळ. |

पुढील सहा गांवें :—

| | |
|---|---|
| १ अवकोर. | ४ टिंगणी बिदरी. |
| २ हीना पारसळगी. | ५ होनगळहल्ली. |
| ३ सुरपळ. | ६ कारजोळ. |

तालीकोटी आणि नालतवाड हे दोन तरफ.

बागेवाडी हा कसबा आणि मसबिनाल व येरवळ ही दोन गांवें.

महम्मदपूर या तरफमधील पुढील चार गांवें :—

| | |
|---|---|
| १ जयनापूर. | ३ उप्पळदिनी. |
| २ बुडणी. | ४ गुरोधळ. |

भागानगर हें तरफ सेडनाकमधील गांव.

चिमळगी ह्या तरफमधील पुढील सात गांवें :—

| | |
|---|---|
| १ दिसाळकोप. | ४ गोळाशिंगी. |
| २ मिजारकोप. | ५ घारी. |
| ३ मुरकाटीहाळ. | ६ लिकलेवाडी. |

७ मौंडघी.

## अहमदनगर जिल्हा

(अहमदनगरच्या कलेक्टरच्या अंमलाखालील)

बारशी पंचमहाल.

डोका ह्या परगण्यांतील पेशव्यांचा हिस्सा.

धारुर परगण्यांतील वाघोला हें गांव.

सीना नदीच्या पश्चिमेकडील हवेली-पारींडा हा परगणा, तसेंच उक्त नदीच्या पूर्वेकडील सानोरी हें गांव.

जामखेड आणि वांगी हे दोन परगणे.

कारेवारीत ह्या प्रांतांतील पेशव्यांचा हिस्सा आणि तसेंच सीना नदीच्या पश्चिमेकडील प्रदेशांतील निजामाचा हिस्सा. आष्टी परगण्यांतील आणि मनूर या तरफमधील पेशव्यांचा हिस्सा. नागा-हवेली आणि रांजणगांव हे दोन तरफ.

पारनेर हा परगणा

बेल्हेंट या तरफ मधील पुढील नऊ गांवें :—

| | |
|---|---|
| १ दावळगांव. | ५ कोळगांव. |
| २ उर्णगांव. | ६ शिदोरी. |
| ३ करंजवण. | ७ उकरगांव. |
| ४ बाबरा. | ८ इसापूर. |

९ आंदळगांव.

खर्डा आणि नेवासा (जळका हें गांव सोडून) हे दोन परगणे, गांजी-बोयरा आणि वावरड हे दोन तरफ बारगांव नांदूर हा परगणा.

टाकळी या गांवासह बिजापूर आणि गंडापूर या दोन परगण्यांतील पेशव्यांचा हिस्सा.

राहुरें, पुणतांबें आणि व्हावें या तीन कसब्यांसह संगमनेर हा परगणा.

धांदरफळ, कोटूळ, अकोला, सिन्नर, कुंभारी, पाटोदें, नाशिक, त्रिंबक, वाघेरा, वणी, दिंडोरी, चेगांव आणि चांदोर हे तेरा परगणे.

(खानदेशच्या कलेक्टरच्या अंमलाखालील.)

लळिंग, सोनगीर, नेर, अंमळनेर, बेटावद, धांगरी, गारंडोळ, जालोद, चांदशहर, भडगांव, माळ उतराण आणि म्हसवें हे तेरा परगणे.

शिंद्यांच्या मालकीचा परंतु ब्रिटीश सरकारच्या अंमलाखालील पाचोरें हा परगणा.

लोहरें-हवेली हा शिंद्यांच्या मालकीचा परंतु ब्रिटिश सरकारच्या अंमलाखालील तरफ.

लोहरें परगण्यांतील सांगवी हा तरफ.

शेंदुर्णी, चाळीसगांव, राजदेश, महोंबेरें आणि माणिकपूरी हे पांच परगणे.

काण परगण्यांतील पुढील अठरा (१८) गांवें :—

| | |
|---|---|
| १ रोळतेर. | १० कानेडी. |
| २ रोहीला. | ११ जळगांव. |
| ३ पोकरी. | १२ जामदें. |
| ४ मल्लीगांव. | १३ तुणवणें. |
| ५ चंपानेर. | १४ पळसगांव. |
| ६ हिंगणा. | १५ माळपूर. |
| ७ नायडोंगरी. | १६ येताळपूर. |
| ८ साखेगांव. | १७ मार्कंडपूर. |
| ९ कादरा. | १८ नरसिंहपूर. |

रांजणगांव व जातेगांव हे दोन कसबे.

गाळणा, त्रिखलओहोळ, टोकरा, जोडगा, लोहनेर, वाखरी, सांडस, जयतेपूर, पिंसोळ, तिळवड, कोरळी, ओतूर, पाला, हातगड, कानशी, पिंपळा, पिंपळनेर, धायवा, वरसा, भामेण, नवापूर, नंदुरबार, सुलतानपूर आणि कुकरमुंडें हे चोवीस परगणे.

पानकेरा, उमरपट्टा आणि चौपाळें हे तीन कसबे.

आकारणीचें मुख्य ठिकाण.

शिंद्यांच्या मालकीचा परंतु ब्रिटिश सरकारच्या अंमलाखालील चोपडें हा परगणा

थाळनेर आणि अंबा हे दोन परगणे.

शिदवा हा कसबा.

शिंद्यांच्या मालकीचा परंतु ब्रिटिश सरकारच्या अंमलाखालील यावल हा परगणा.

अडावद व सावदें हें दोन परगणे.

चांगदेव हें गांव.

रावेर (पाल या तरफासह) हा परगणा.

नाशिराबाद, जामनेर, बोदवड आणि बोरनार हे चार परगणे.